इष्ट ते छापणार

संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

संपादक : मिलिन्द बल्लाळ

# ठाणे वैभव

वर्ष ३३। अंक ७०। रविवार। ४ नोव्हेंबर २००७ ● राष्ट्रीय सौर कार्तिक १३ शके १९२९



फोटो सर्कल सोसायटीच्या स्पर्धेत स्माईल गटातील सुजीत म्हात्रे यांचे प्रथम बक्षिस विजेते छायाचित्र.



फेस्टिवल गटातील प्रदीप कर्वे यांचे प्रथम मानांकित छायाचित्र.



लेन्स आणि शॅडो गटातील सुभाष आव्हाड यांचे तृतीय मानांकित छायाचित्र.

# ठामपातर्फे छायाचित्रकारांना प्रोत्साहन - निर्भय पाटील

ठाणे, दि.३ (वार्ताहर)- फोटो सर्कल सोसायटी आणि ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त, विद्यमाने ठाणे महापौर छायाचित्र पुरस्कार 'अविष्कार २००७' या प्रदर्शनाचे उद्घाटन राष्ट्रपती पुरस्कार विजेते निर्भय पाटील यांच्या हस्ते आणि आमदार एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडले. याप्रसंगी महापौर सौ.स्मिता इंदुलकर यांनी दिप प्रज्वलन केले.

ठाणे महानगरपालिका ही छायाचित्रण कलेस प्रोत्साहन देणारी राज्यातील एकमेव महापालिका असावी असे प्रतिपादन श्री.पाटील यांनी केले. गेले नऊ वर्षे सातत्याने स्पर्धा व प्रदर्शन आयोजित करणाऱ्या फोटो सर्कल सोसायटीने राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा आयोजित करुन एक पाऊल पुढे टाकावे असे सांगितले.

उद्घाटन समारंभास उपमहापौर अशोक भोईर, स्थायी समिती सभापती राजन किणे, सभागृहनेते विलास सामंत, क्रिडा व सांस्कृतिक सभापती दशरथ पालांडे, गोपाळ लांडगे, संजय मोरे, कांती कोळी, संजय वाघुले, सुजाता पाटील, नरेश म्हस्के व फोटो सर्कलचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

फोटो सर्कल सोसायटीचे उपाध्यक्ष प्रविण देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले हे प्रदर्शन नागरिकांसाठी ३ आणि ४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत विनामुल्य खुले राहील.